# कुलगुरुपदासाठी मुलाखतींची तयारी सुरू

## २६, २७ रोजी मुलाखती; कागदपत्रे संकलन, पॉवर पॉंईट प्रेझेंटेशनवर भर

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची निवड प्रक्रिया सुरू आहे. २८ जणांची यादी प्रसिद्ध झाली असून यातील पाच जणांची निवड अंतिम मुलाखतीसाठी होणार आहे. यासाठी उमेदवारांची तयारी सुरू असून कागदपत्रांची जुळवाजुळव करणे, पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन बनवण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या सर्व उमेदवारांच्या मुलाखती २६ आणि २७ सप्टेंबरला होणार आहेत.

कुलगुरू पदाच्या प्रक्रियेला वेग आला असून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात नव्या कुलगुरूंची घोषणा होईल, असा अंदाज प्रशासनातील अधिकारी व्यक्त करतात. कुलगुरुपदासाठी १६९ जणांनी अर्ज केले होते. या अर्जांची छाननी झाल्यानंतर कुलगुरू शोध समितीने मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी २८ जणांची नावे निश्चित केली. त्यांच्या मुलाखती शनिवारी (ता. २६) आणि रविवारी (ता. २७) होणार आहेत. या ऑनलाईन मुलाखतीसाठी निवड झालेल्या २८ जणांना प्रत्येकी एक तासाचा वेळ दिला आहे. त्यामध्ये त्यांना विद्यापीठाचे व्हिजन, स्वतःची वाटचाल, आदींबाबतचे सादरीकरण करावयाचे आहे. या मुलाखतीपूर्वी त्यांना पदवीची प्रमाणपत्रे, नियुक्तीचे पत्र आणि कुलगुरुपदासाठी कसे पात्र आहात याबाबतची दोन पानांची माहिती, तीन व्यक्तींची संदर्भपत्रे, आदी कागदपत्रे सादर करावयाची आहेत. त्याची तयारी मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवार प्राचार्य, प्राध्यापकांकडून सुरू झाली आहे. यापूर्वी कुलगुरुपदासाठी पात्र ठरलेले, मुलाखत देणाऱ्यासह या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या भेटीगाठी त्यांच्याकडून सुरू झाल्या आहेत. आवश्यक कागदपत्रांच्या प्रती जमा करण्याचे काम त्यांच्याकडून करण्यात येत आहे.

### राजकीय संपर्कावर भर

सध्या राज्यात तीन पक्षांचे सरकार आहे. निवड करणारे राज्यपाल चौथ्या पक्षाचे आहेत. राजकीय पक्षांचा कुलगुरू निवडीत वरचष्मा असतो, हे उघड सत्य आहे. त्यामुळे आता पहिल्या यादीमधील उमेदवारांनी राजकीय नेत्यांशी संपर्क करणे सुरू केले आहे. चारही पक्षांतील नेत्यांशी संपर्क सुरू असल्याचे राजकीय पक्षातील नेते सांगतात.



# ना गप्पांचे फड ना तरुणाईचा सळसळता उत्साह

## शिवाजी विद्यापीठ अनुभवतेय नीरव शांतता



शिवाजी विद्यापीठातील या परिसरात एकेकाळी विद्यार्थ्यांच्या गप्पांचा फड रंगायचा. एखादा वाद्याचा कार्यक्रम येथे व्हायचा. आता मात्र हा परिसर रिकामा आणि सुनासुना भासत आहे. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

टेंबलाबाई, ता. २२ : शिवाजी विद्यापीठात सध्या केवळ नीरव शांतताच आहे. तरुणाईचा सळसळता उत्साह इथे दिसत नाही. गप्पांचे रंगलेले फड, कॅन्टिनमधले वाफाळलेले चहाचे कप, अधिविभागात असणारी विद्यार्थ्यांची लगबग आणि विविध उपक्रमांनी गजबजणारी सभागृहे या सगळ्याची आठवण इथे आल्यावर येते. कोरोनाचा परिणाम सर्वच घटकांवर झाला, तसा तो विद्यापीठावरही झाला. कोरोनामुळे परीक्षा, अभ्यासक्रम, नवीन प्रवेश हे थांबलेच; पण विद्यापीठातील उत्साहही हरवला.

विद्यार्थीविना विद्यापीठ ही कल्पनाही कधी कोणी केली नसेल. ज्ञानार्जनासाठी विद्यापीठात विद्यार्थी येतात. त्यांच्या भावभावनांना, व्यक्तिमत्त्वाला इथे आकार मिळतो. त्यांच्यातील कलागुणांना विद्यापीठ व्यासपीठ देते. विद्यापीठ म्हणजे या विद्यार्थ्यांचे अंगणच असते. 'जो जे वांछिल तो ते लाभो' या उक्तीप्रमाणे विद्यार्थी या अंगणात अनेक गोष्टी आत्मसात करतात. हे करत असताना त्यांच्यातील उत्साह, कल्पकता येथील वातावरण भारून टाकते. म्हणून इथे येणाऱ्या प्रत्येकालाच त्यांच्यातील तारुण्याची जाणीव होते. मात्र, सध्या हा उत्साहच या परिसरातून हरवला आहे.

बंद वर्ग, कुलूप घातलेल्या वसतिगृहातील खोल्या निरुत्साह दर्शवतात. सकाळी १० वाजता कर्मचारी येतात, आणि पाच वाजता निघून जातात. एखाद्या शासकीय कार्यालयासारखेच सध्या विद्यापीठातील वातावरण भासत आहे. लवकरच कोरोनाचे सावट दूर होईल आणि पुन्हा एकदा हा परिसर विद्यार्थ्यांच्या उत्साहाने भारून जाईल, याची प्रतीक्षा लागली आहे.

> **या काळात प्रवेश निश्चित होऊन नव्या विद्यार्थ्यांची उत्साही लगबग विद्यापीठ परिसरात असते. यंदा मात्र कोरोनामुळे आम्ही विद्यापीठात जाऊ शकत नाही. तिथल्या बागेतील गप्पांचे फड, ग्रंथालयातील पुस्तके, मित्रमैत्रिणींचा सहवास, कॅन्टिनचा चहा या सर्व गोष्टी आठवतात. लवकरच विद्यापीठ पुन्हा उत्साहाने सुरू होईल, अशी आशा आहे.**
> **- मयूर कांबळे, विद्यार्थी**



# ऑनलाईन परीक्षेला सामोरे जाताना

**प्रासंगिक**

शिक्षणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व त्यातील आशय महत्त्वाचा असतो. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी काय-काय साध्य करू शकेल, उदा. त्याला कोणते ज्ञान, आकलन, कौशल्ये, क्षमता अवगत होतील यासाठी अध्ययन निष्पत्ती दिल्या जातात व अध्यापन निष्पत्तींना अनुसरून मूल्यमापनांची साधने निवडली जातात. थोडक्यात, काय तर अभ्यासक्रमाची उद्दिष्ट्ये कितपत साध्य झाली, हे तपासण्यासाठी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आवश्यक असते. मूल्यमापन करण्यासाठी परीक्षा हे मुख्य साधन वापरले जाते व यामध्ये लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षांचा मुख्यत: वापर केला जातो.

कोरोना महामारीमुळे इतर अनेक क्षेत्रांप्रमाणेच शिक्षणक्षेत्रही अक्षरश: ढवळून निघाले आहे. सुरुवातीला या महामारीच्या काळात ऑनलाईन अध्ययन-अध्यापन यावर भर दिला तर परीक्षा घ्याव्यात की नको यावर वादंग निर्माण झाले. खरे म्हटले तर परीक्षा ही एकूण शिक्षणव्यवस्थेचे हृदयच आहे, असे म्हणता येईल. त्यामुळे त्या कशा घ्याव्यात याविषयी विद्यार्थ्यांमध्ये, शिक्षकांमध्ये व विद्यापीठे, प्रशासनामध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली होती. सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घ्यायलाच पाहिजेत, असा निर्णय दिल्यानंतर त्याचा आदर राखून आता मात्र सर्वच विद्यापीठांतील प्रशासन व परीक्षा विभाग जोमाने कामाला लागले आहेत. परीक्षा तर सुरक्षित घ्यायच्या, त्याचे पावित्र्य तर जपायचे, विद्यार्थ्यांना शारीरिक व भावनिक इजा होणार नाही, हे सर्व सांभाळून परीक्षा आयोजित करणे ही खरे तर तारेवरची कसरत आहे. विद्यार्थ्यांना परीक्षासाठी ऑफलाईन किंवा ऑनलाईन या पैकी एकाचा स्वीकार करावा लागेल. येथे विद्यार्थ्यांची सुरक्षितता यांची काळजी, परीक्षा घेणाऱ्यांची काळजी याला महत्त्व दिले पाहिजे. परीक्षा ही कमी वेळामध्ये म्हणजे एक तासाची असेल तसेच ५० गुणांची असेल. यामध्ये २५ किंवा ५० प्रश्न असतील व हे प्रश्न काठिण्य पातळीनुसार असतील. विद्यार्थ्यांनी जेवढा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. त्यावरच आधारित प्रश्न असतील असे माननीय उच्च शिक्षणमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले आहे. विद्यापीठ आपल्या महाविद्यालयांनी परीक्षा कशी घेणे अपेक्षित आहे, या विषयी संवाद साधत आहे. आपणही महाविद्यालयाशी संपर्क साधावा, विद्यार्थ्यांनी आपल्या फोनवर किंवा ई-मेलवर जी परीक्षेविषयी माहिती येणार आहे. त्याकडे लक्ष द्यावे. त्याचप्रमाणे स्वत:चा जो मोबाईल नंबर व ई-मेल आयडी वापरात आहे तोच द्यावा. महाविद्यालय किंवा विद्यापीठ या दोन माध्यमांद्वारे आपल्याशी संपर्क साधणार आहे. त्यामुळे माझा फोन नंबर बदलला, फोन बाद झाला, ई-मेल ओपन होत नाही, अशी कारणे सांगू नयेत. फोन रिचार्ज करून ठेवावेत. इंटरनेट रेंज जिथे चांगले येते ते ठिकाण ठरवावे या गोष्टी जर तुम्ही व्यवस्थित हाताळल्या तर तुमचा अर्धा ताण कमी होईल. तसेच, विद्यार्थ्यांनी स्वत:च्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

पारंपरिक पद्धतीने परीक्षा देताना काही विद्यार्थ्यांना भीती वाटते, ताण येतो, तब्येत बिघडते असे प्रकार होत असतात. अशा तक्रारी उद्भवणार नाहीत यासाठी योग्य तो संवाद शिक्षकांशी साधावा. ऑफलाईन परीक्षा हा जर काही विद्यार्थी पर्याय निवडणार असतील तर त्यांनी स्वत: जवळ सॅनिटायझर ठेवणे, पाणी ठेवणे, खाण्याच्या वस्तू ठेवणे गरजेचे आहे. तुम्ही जर गावाकडून येणार असाल व बसमधून किंवा गाडीने प्रवास करणार असाल तर योग्य ती काळजी घ्या. परीक्षेच्या ठिकाणी आल्यावरदेखील तेथील सुरक्षितता पाहा. त्याचप्रमाणे महाविद्यालयांनी दुर्गम भागात मोबाईल तसेच संगणक, टॅब आदी साधने व त्यांना इंटरनेट उपलब्ध होत नसेल तर परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्याव्यात. त्यासाठी पुरेशी बैठक व्यवस्था, वर्गखोल्या उपलब्ध आहेत का त्याची खात्री करून घ्यावी. परीक्षांच्या ठिकाणी सॅनिटायझर, शरीराचे तापमान व हृदयाचे ठोके मोजण्याची साधने, पुरेसा ऑक्सिजनची उपलब्धता, प्रथमोपचार सुविधा, स्वच्छतागृहांची स्वच्छता, पाण्याची सुविधा, स्वच्छ वर्ग, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी मास्कचा वापर करणे, सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक आहे.

विद्यार्थी किंवा परीक्षा घेणारे कर्मचारी यांना मागील दिवसांमध्ये गंभीर आजार झाला असेल किंवा त्यांनी चाचणीसाठी स्वॅब दिला असेल तर ती माहिती लपवून ठेवू नये ती त्यांनी स्वत:हून प्रशासनाला कळवावी. प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका देताना सॅनिटायझर किंवा हँडग्लोव्हजचा वापर करावा, थुंकी लावू नये, परीक्षा घेणाऱ्या आवश्यक तेवढ्याच कर्मचाऱ्यांना येण्यास सांगावे, परीक्षा जर दोन तसेच तीन किंवा काही ठिकाणी चार सत्रांमध्ये घ्यावयाची असेल तर कर्मचारी बदलावेत. परीक्षा झाल्यावर विद्यार्थी गर्दी करणार नाहीत, एकत्रित येणार नाहीत किंवा योग्य ते सामाजिक अंतर ठेवूनच बोलतील याकडे लक्ष द्यावे.

विद्यार्थ्यांनी मॉक टेस्टचा सराव करावा जेणे करून त्यांची परीक्षा देताना धांदल उडणार नाही किंवा विद्यापीठाने व महाविद्यालयांनी आधी दोन दिवस विद्यार्थ्यांना तशी संधी उपलब्ध करून द्यावी. विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा देताना त्यांच्या प्रामाणिकपणाची कसोटी लागणार आहे, तेथे पर्यवेक्षक नसणार आहेत, त्यांना कोणाचीही मदत न घेता ही प्रश्नपत्रिका सोडवायची आहे. ऑनलाईन पेपर जेव्हा तुमच्या ई-मेल वर किंवा व्हॉटस् ॲपवर आल्यानंतर तो प्रथम डॉऊनलोड करून घ्यावा. जेणेकरून नेट कनेक्टीव्हिटी जरी गेली तरी विद्यार्थ्यांना तो पेपर सोडवता येईल. यासंबंधी परीक्षा विभागाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. विद्यार्थी मित्रहो, आपण आतापर्यंत अनेक परीक्षा दिलेल्या आहेत. त्यासारखीच हीदेखील परीक्षा आहे. यादेखील परीक्षेला आपण धीराने, आत्मविश्वासाने सामोरे जावे. कोणतेही दडपण, भीती बाळगण्याची गरज नाही.

**- प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर**